जा.क्र./डीजीपी/ 137 /२०१३.

जिल्हा सरकारी वकील कार्यालय,
नांदेड.
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१३.

प्रति,

मा. स्वप्निल कापडणीस
कार्यासन अधिकारी,
कार्यासन – ७
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई – ३२.

**विषय : नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन २०१२–१३ साठीच्या केआरए मध्ये प्रसिध्द करणे बाबत...**

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.डिजीपी/७९१/१२ दिनांक १३ जुन, २०१२.
२. आपले पत्र क्र.केआरए२०१२/प्रक्र.१०/का.७ दिनांक १७.०१.२०१३.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सेवेत सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयामध्ये नागरिकांची सनद तयार करण्यात आली असुन नागरिकांच्या सनदेचे फलक लावण्यात आलेले आहे. तयार करण्यात आलेल्या नागरिकांच्या सनदेची एक प्रत आपल्या माहितीसाठी संदर्भांकित पत्र क्र. १ अन्वये पाठविण्यात आली होती. परत या सोबत एक प्रत व सिडी ( पीडीएफ )स्वरूपात पाठविण्यात येत आहे.

करीता माहितीस्तव सेवेत सविनय सादर.

आपला विश्वासु,

( बि. आर. भोसले )
जिल्हा सरकारी वकील, नांदेड.

# जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय, नांदेड.

## नागरिकांची सनद

**(एक) आपली संघटना, तीची कामे व कर्तव्य यांचा तपशील :-**

या कार्यालयाचे नाव **जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय, नांदेड** असे आहे सदर कार्यालय हे विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अधिपत्याखाली येते. या कार्यालयाचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

जिल्हा सरकारी वकील तथा
लोक अभियोक्ता कार्यालय,

**रेल्वे स्टेशन रोड,**
**जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,**
**नांदेड – ४३१६०१**

या कार्यालयाचे प्रमुख म्हणुन **जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, नांदेड** हे काम पाहतात. नांदेड जिल्हयामध्ये नांदेड सह बिलोली, कंधार व भोकर येथे सरकारी वकील तथा अतिरीक्त लोक अभियोक्ता यांचे कार्यालय स्थापन झालेले आहे. जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालयात (नांदेड सह बिलोली, कंधार व भोकर ) जिल्हा सरकारी वकीलासह एकुण 13 सरकारी वकील कार्यरत आहेत. त्यांचे कार्य व कर्तव्य या बाबतची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

***येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली.***

जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय नांदेड या कार्यालयाची कार्यपध्दती जिल्हा सरकारी वकील नांदेड यांच्या अधिकार क्षेत्राखाली कार्यरत आहे व तसेच या बाबतीत वेळोवेळी विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या कडुन निर्गमित करण्यात आलेले आदेश यांचाही समावेश होतो. तसेच हा न्यायिक विभाग असल्याने कायदा व नियम यांनी अनुबंधीत केलेल्या तरतुदीनुसार निर्णय घेतले जातात.

***(चार) कार्यालयाचे कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके :***

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, नांदेड या कार्यालयात जिल्हा सरकारी वकील हे दिवाणी, फौजदारी व भु–संपादनाची प्रकरणे सर्व सहाय्यक सरकारी वकीलांना महाराष्ट्र शासनाने निर्धारीत केलेल्या दैनंदिन मोबदल्याच्या अनुषंगाने कामाचे वाटप करतात. तसेच या कार्यालयाचे विधी व न्याय विभागाकडुन मिळणा–या निर्देशानुसार कामकाज चालते.

***(पाच) आपली कामे पार पाडण्यासाठी त्याने धारण केलेले किंवा त्यांच्या नियंत्रणाधीन असलेले किंवा त्यांच्या कर्मचा–याकडुन वापरण्यात येणारे नियम, विनिमय, निर्देश नियम पुस्तीका व अभिलेख यांचा तपशिल :–***

दिवाणी व फौजदारी नियम सुचिद्वारे **Civil and Criminal Manual** द्वारे कर्मचा–यांची कर्तव्य ठरविण्यात आलेली आहेत. व त्याला अनुसरूनच ते ती कर्तव्य पार पाडीत असतात. तसेच जिल्हा सरकारी वकील नांदेड यांनी वेळो–वेळी निर्देशित केलेल्या परिपत्रका प्रमाणे कर्तव्य पार पाडीत असतात.

**(दोन) कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य :--**

१. जिल्हा सरकारी वकील यांना कार्यालय प्रमुखाचे सर्व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. कार्यालयातील कामकाज परदर्शी व गतीमान चालविण्यासाठी ते या अधिकारांचा वापर करतात.

२. दिवाणी व फौजदारी तसेच भु--संपादनाच्या प्रकरणात शासनाची बाजु मांडणे.

३. कार्यालयातील ईतर सहाय्यक सरकारी वकीलांना फौजदारी, दिवाणी व मु--संपादनाची प्रकरणे चालविण्यासाठी समप्रमाणात वाटप करणे.

४. या कार्यालयाकडुन ईतर शासकिय कार्यालयांनी अभिप्राय मागितल्यास त्यांना कायदेशिर अभिप्राय देणे.

५. मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने पुरविलेल्या वर्ग तीन व चार च्या कर्मचा--यांना विभाग वाटप करून देवुन त्यांच्या कडुन संबंधीत काम सुरळीतपणे करून घेणे. तसेच निकाली प्रकरणामध्ये अपिलाच्या संदर्भातील कार्यवाही कामी योग्य कागद--पत्रे पुरवुन आवश्यक त्या सर्व प्रकरणामध्ये अपिल दाखल करण्याची कार्यवाही करून घेणे. तसेच सरकारी वकीलांनी काम पाहिलेल्या फौजदारी प्रकरणांसाठी मानधनाची देयके संबंधीत कर्मचा--यांकडुन तयार करून घेणे व भु--संपादन प्रकरणाच्या फि चे देयके संबंधीत विभागास पाठविण्याची कार्यवाही संबंधीत कर्मचा--यांकडुन करून घेणे. तसेच वर्ग तीन व चार चे कर्मचारी हे सरकारी वकिलांच्या निर्देशाप्रमाणे उपरोक्त नमुद सर्व कामे नियमानुसार करतात.

**(तीन) कार्यालयाच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरणात**

**(सहा) या कार्यालयाकडे असलेल्या किंवा या कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गीचे विवरण :–**

१. सत्र प्रकरणांची नोंदवही.

२. दिवाणी प्रकरणांची नोंदवही.

३. भु–संपादन प्रकरणांची नोंदवही.

४. निकाल नोंदवह्या. (सत्र, दिवाणी व भु–संपादन)

५. अपिल नोंदवह्या. (सत्र, दिवाणी व भु–संपादन)

६. प्रकरण वाटप नोंदवह्या. (सत्र, दिवाणी व भु–संपादन)

७. आवक–जावक नोंदवह्या.

८. टपाल वही.

९. मुद्रांक वही.

१०. लेखा, कोषागार, रोकड वेतनपट, अनुदान, गोपनिय, अग्रिम, अभिप्राय, धनादेश नोंदवही, ईत्यादी मजकुरांचे दस्तऐवज असतात.

**(सात) आपली धोरणे तयार करण्याच्या किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात जनतेतील प्रतिनिधीत्व करण्यासाठी अस्तीत्वात असलेल्या कोणत्याही व्यक्तीशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदन केली जाण्यासाठी अस्तीत्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल :–**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, नांदेड हे कार्यालय न्यायिक विभाग असल्याने सरकारी वकीलांना कायद्यातील तरतुदीनुसारच काम कारावे लागते. त्यामुळे या कार्यालयात धोरण तयार करण्याच्या किंवा संबंधीत धोरण अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनिमय

करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदन केले जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही.

**(आठ) मंडळाचे, परिषदांचे, समित्याचे आणि त्यांचा भाग बनलेल्या किंवा त्यांना सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळुन बनलेल्या ईतर संस्थाचे आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या व ईतर संस्था जनतेसाठी खुल्या आहेत किंवा कसे, किंवा अशा बैठकांची कार्यवृत्ते जनतेस मिळण्यायोग्य आहेत किंवा कसे या संबंधीचे विवरणे :--**

जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय, नांदेड या कार्यालयात सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी कुठलेही मंडळ, परिषद किंवा समिती नाही.

**(नऊ) या कार्यालयातील अधिका–यांची आणि कर्मचा–यांची निर्देशिका**

जिल्हा सरकारी वकील, नांदेड या कार्यालयाचे प्रमुख हे जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता हे असतात व त्यांच्या अभिपत्याखाली बाकी सहा. सरकारी वकील तथा अतिरीक्त लोक अभियोक्ता असतात. जिल्हा सरकारी वकील यांची वाटप केलेल्या कामा नुसार सर्व सहा. सरकारी वकिल तथा अतिरीक्त लोक अभियोक्ता हे जिल्हा न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय व.स्तर, कामगार न्यायालय ई. न्यायालयात दिवाणी, फौजदारी तसेच भु–संपादन प्रकरणात सरकार पक्षाच्या बाजुने काम पाहतात व त्यांच्या मदतीकरिता जिल्हा न्यायालया तर्फे कर्मचारी वर्ग पुरविण्यात आलेला आहे.

**(दहा) या कार्यालयातील प्रत्येक अधिका–यास व कर्मचा–यांस मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या**

**(तेरा) या कार्यालया मार्फत दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्र मिळणा–यांचा तपशिल :–**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड या कार्यालया मार्फत कोणत्याही प्रकारच्या सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे दिले जात नाहीत.

**(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात निविष्ट केलेली त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा त्यांने धारण केलेल्या माहिती बाबत तपशिल :–**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड यांची स्वतंत्र वेबसाईट उपलब्ध नाही. व या कार्यालयासाठी जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड यांच्या मार्फत दोन थींक क्लाईट (**संगणक**) व विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांच्या मार्फत पुरविण्यात आलेल्या दोन संगणका पैकी एक संगणक बंद असल्यामुळे उर्वरित एक संगणक व दोन थींक क्लाईट (**संगणक**) चाच वापर करण्यात येतो.

**(पंधरा) जर सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असतील तर, ग्रंथालय किंवा वाचनालयांच्या वेळांसह, माहिती मिळविण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशिल :–**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड या कार्यालयात नागरिकांना माहिती मिळविण्यासाठी माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. नागरिक योग्य त्या अधिका–यांकडे त्यांच्या अवश्यकते नुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदिनुसार अर्ज देउन माहिती प्राप्त करू शकतात. तसेच या कार्यालयात कायदेविषयक पुस्तकांचे स्वतंत्र ग्रंथालय आहे व ते फक्त या कार्यालयातील सरकारी वकील यांच्या करीताच आहे.

***विनीयमामध्ये तरतुद केल्या प्रमाणे नुकसान भरपाई देण्याच्या पद्धतीचा तपशिल :–***

जिल्हा सरकारी वकील कार्यालय येथे कार्यरत असणा–या सरकारी वकीलांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या नियमानुसार त्यांच्या कामाचे देयक तयार करून मोबदला दिला जातो. तसेच वर्ग तिन व चार चा कर्मचारी वर्ग हा जिल्हा व सत्र न्यायालया कडुन पुरविण्यात आलेला असल्यामुळे त्यांच्या वेतनाचा तपशिल या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच नुकसान भरपाई देण्याची पद्धत प्रचलीत नाही.

***(अकरा) या कार्यालयाच्या सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुण दिलेल्या आर्थसंकल्प आणि सावितरीत केलेल्या रक्कमेचा तपशिल :–***

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड या कार्यालया तर्फे न्यायालयातील विविध दिवाणी, फौजदारी तसेच भु–संपादन व अन्य प्रकरणात फक्त सरकारची बाजु मांडण्याचे काम पाहिले जाते. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या योजना राबविल्या जात नसल्याने त्यासाठी प्रस्तावित खर्च दर्शविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

***(बारा) या कार्यालयाची अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रित तसेच कार्यालया मार्फत वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभार्थिका–यांचा सविस्तर तपशिल :–***

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड या कार्यालयात काम करणा–या कोणत्याही सरकारी वकीलास त्यांच्या कामाच्या मोबदल्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य दिले जात नाही.

(सोळा) जन माहिती अधिका–यांची नांवे, पदनाम व ईतर तपशिल :–

| | |
|---|---|
| माहिती अधिकारी | सौ. अ.ज.कुंटीकर,<br>साहा.सरकारी वकील<br>भ्रमणध्वणी कमांक–९४२२४१३५४८ |
| अपिलीय अधिकारी | श्री बि.आर.भोसल<br>जिल्हा सरकारी वकील<br>भ्रमणध्वणी कमांक–९४२२१७०५७८ |

(सतरा) विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती :–

जिल्हा सरकारी वकील कार्यालय नांदेड या कार्यालया मार्फत विविध न्यायालयात फौजदारी दिवाणी व भु–संपादन प्रकरणात सरकार पक्षाची बाजु मांडण्याचे काम पाहिले जाते. या कामी विविध शासकीय कार्यालयाचा व संबंधित अधिकारी व कर्मचा–यांचा या कार्यालयाशी संबंध येतो. संबंधित प्रकरणातील सरकारी साक्षीदारांना योग्य ती माहिती दिली जाते व आवश्यकते मार्गदर्शन वेळो–वेळी केली जाते. या प्रकीयेत कोणत्याही प्रकारची गोपनियता नसते. सर्व सरकारी वकील कायद्यातील तरतुदीनुसार काम करतात.

तसेच या कार्यालयाकडे विविध कार्यालयाकडुन मागविण्यात आलेले कायदेशिर अभिप्राय त्या–त्या कार्यालयास गोपनियरित्या कळविण्यात येते. व सदरील कायदेशिर अभिप्राय हा या कार्यालयात गोपनियरित्या संचित करून ठेवला जातो. व अभिप्रायाची प्रत ही ईतर कोणासही दिल्या जात नाही.

( बि.आर.भोसले )
जिल्हा सरकारी वकील
तथा लोक अभियोक्ता,नांदेड

नां दे ड.
दिनांक १२.०६.२०१२